**अनावर रेघोट्या..**

लिहीताना, हात थरथरतो माझा
कधी शब्दंही अडकतात..
वाचताना, तुझेही डोळे पाणावत असतील ना?
दाबून टाकलेल्या आठवणी,
पापणीच्या काठावर येऊन थडकत असतील ना?
होतो एखादा क्षण असा अनावर
जेंव्हा नाही रोखता येत सगळं ..
आणि बोलताही नाही येत.
व्यक्तं आणि अव्यक्तातलं अंतर
कापत जातं काळीज
मात्र जखम नाही दिसत..
नाहीच लिहीत मग मी!
कोऱ्या मनाने कोऱ्या कागदावर
रेघोट्या तेवढ्या उमटत रहातात..
आणि तुझ्याही बंद डोळ्यांआड
भावनांचे कढ गोठत रहातात !

**©प्रीती देशपांडे**
[visit www.meetipreeti.com email: preeti@meetipreeti.com]